महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २० वे | दिनांक : ०८/०१/२०२६ | वार : गुरूवार

## अजित पवार हेच महाराष्ट्राचे आका आमदार महेश लांडगे



**पुणे** : अजित पवार हेच महाराष्ट्राचे आका असून आधी त्यांनी स्वतःच्या मुलाचा पराक्रम पाहावा आणि नंतर आमच्यावर टीका करावी, असा टोला भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी लगावला आहे. तसेच अजित पवार हे स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपसोबत आले आहेत, त्यांनी आम्हाला शिकवू नये, अशी खरमरीत टीका लांडगे यांनी केली आहे. अजित पवारांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांवर लांडगे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना उत्तर दिले आहे.

आमदार महेश लांडगे म्हणाले, आधी स्वतःच्या लोकांचे पराक्रम पाहा आणि ते स्वतः आका आहेत, हे त्यांनी जाहीर करावे. ते मला पिंपरी चिंचवडचा आका म्हणत आहेत, मुळात अजित पवार हेच महाराष्ट्राचे आका आहेत. दरम्यान, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महेश लांडगे आणि अजित पवार यांच्यात चांगलीच जुंपली असल्याचे पाहायला मिळत आहे.

पुढे बोलताना महेश लांडगे म्हणाले, सध्या अजित पवारांचा अहंकार बोलत आहे, ते नैराश्यात आहेत. स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपमध्ये आलेल्या अजित पवारांनी आमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करू नयेत. तसेच आमच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध करायचे असतील तर मी, पालिका प्रशासन आणि अजितदादांनी सामोरासमोर बसावे, मग सर्व उत्तर मिळतील, असे आवाहन लांडगे यांनी केले आहे.

आमदार महेश लांडगे यांनी अजित पवारांनी केलेल्या टीकेला तसेच आरोपांवर जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. तसेच जे स्वतःच्या काकाचे होऊ शकले नाहीत, ते पिंपरी चिंचवडचे होतील का? असा सवाल उपस्थित करत लांडगे यांनी अजित पवारांची खिल्ली उडवली आहे. दोन्ही नेत्यांमध्ये सुरू असलेल्या वादामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकीकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

## शब्दाला जागून प्रचारासाठी शहरात पाऊलही टाकू नये : अंबादास दानवे




**छत्रपती संभाजीनगर** : शहरातील भीषण पाणी टंचाईच्या प्रश्नाने आता राजकीय तापमान कमालीचं वाढवलं असून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. शहरातील नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा करण्यात सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप करत, दानवेंनी सत्ताधाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र शब्दांत टीका केली. पाण्यासंदर्भात सातत्याने दिशाभूल करणाऱ्या महायुतीच्या नेत्यांना आता छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रचार करण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. शहरातील प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचवण्याच्या घोषणा केवळ कागदावरच राहिल्या असून, प्रत्यक्षात नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचं वास्तव दानवेंनी अधोरेखित केलं.

विशेषतः राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांचा उल्लेख करत दानवेंनी अत्यंत बोचरी टीका केली. एकेकाळी स्वतःला जलसाम्राट, म्हणवून घेणारे आणि शहरभर बॅनरबाजी करणारे मंत्री आता पाण्याच्या प्रश्नावर 'मौनी बाबा' झाले असल्याचा सणसणीत टोला त्यांनी लगावला. शहरात पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना, जबाबदार मंत्र्यांचे मौन नागरिकांच्या संतापात भर घालणारे आहे, असे दानवेंनी म्हटले. पाणीपुरवठा योजनांच्या उद्घाटनावेळी मोठमोठी आश्वासने दिली गेली, मात्र प्रत्यक्षात त्या योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचलाच नाही, असा आरोपही त्यांनी केला.

अंबादास दानवे यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट शेअर करत महायुती सरकारच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पाणीपुरवठा योजनेतील अपयश झाकण्यासाठी आता प्रशासनातील अधिकाऱ्यांना नोटिसा बजावल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला. स्वतःच्या चुकीच्या नियोजनामुळे आणि अकार्यक्षमतेमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे खापर अधिकाऱ्यांवर फोडण्याचा हा प्रकार म्हणजेच महायुतीने अप्रत्यक्षपणे आपला पराभव मान्य केल्याचा पुरावा आहे, असे दानवेंनी स्पष्ट शब्दांत नमूद केले. प्रशासनावर दबाव टाकून प्रश्न सुटणार नाहीत, तर ठोस निर्णय आणि राजकीय इच्छाशक्ती लागते, असा इशाराही त्यांनी दिला.

## मराठी माणसाच्या भल्यासाठी मुंबईत ठाकरेच विजयी व्हावेत : राजू शेट्टींचा ठाकरे बंधूंना पाठिंबा

**धाराशिव** : मराठी माणसाच्या भल्यासाठी मुंबईत ठाकरेच विजयी व्हावेत, आमची त्यांना सहानुभूती असल्याचे विधान शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केले आहे. तसेच महाराष्ट्राच्या हक्काचे किती प्रकल्प गुजरातला पाठवले याची माहिती घ्यावी, म्हणजे मुख्यमंत्र्यांचे मराठीवरील प्रेम दिसून येईल, असा टोलाही शेट्टी यांनी लगावला आहे. धाराशिव येथे शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात झालेल्या आंदोलनानंतर राजू शेट्टी माध्यमांशी बोलत होते.

आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षांचे प्रचार सुरू झाले आहेत. तसेच राजू शेट्टी यांनी महाराष्ट्रातील इतर ठिकाणी काँग्रेसला पाठिंबा दिला असला तरी मुंबईत मात्र त्यांनी ठाकरेंना पाठिंबा दिल्याचे पाहायला मिळत आहे. आमचे वैचारिक मतभेद असले तरीही मुंबईत मराठी माणसाच्या भल्यासाठी ठाकरे बंधूच विजयी व्हावेत, असे राजू शेट्टी म्हणाले. मुंबईवर, मराठी माणसावर प्रेम आहे, त्यांच्या विकासासाठी आपण प्रयत्न करत आहोत असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. यावर प्रतिक्रिया देताना राजू शेट्टी म्हणाले, महाराष्ट्राच्या हक्काचे प्रकल्प गुजरातला किती पाठवले त्याची माहिती घ्या म्हणजे त्यावरून मराठीवर मुख्यमंत्र्यांचे प्रेम दिसून येईल, असा टोला शेट्टी यांनी लगावला आहे. दरम्यान, राजू शेट्टी यांनी शक्तिपीठ महामार्गाला विरोध दर्शवला असून त्यांनी आज धाराशिव-सोलापूर सीमावर्ती भागात शेतकऱ्यांचे अधिवेशन घेतले. यात त्यांनी सरकारच्या धोरणांवर सडकून टीका केली आहे.

दरम्यान, शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी हिंगोलीत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. हा महामार्ग हिंगोलीच्या वसमत यमी कळमनुरी तालुक्यातून जात असल्याने यासाठी शेतकऱ्यांची शेकडो एकर सुपीक जमीन हस्तांतरित केली जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ येईल, असा दावा करत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ८ जानेवारी २०२६


## इकरा पब्लिक स्कूलमध्ये भूगोल विषयाचे मार्गदर्शन संपन्न; आरिफ खान यांच्या 'मॅजिक टिप्स'ने विद्यार्थी भारावले



**जळगाव :** दहावीच्या (SSC) बोर्ड परीक्षेच्या पार्श्वभूमीवर, जळगाव येथील इकरा पब्लिक स्कूलमध्ये भूगोल विषयासाठी एका विशेष मार्गदर्शन सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.या सत्रात प्रसिद्ध भूगोल विषय तज्ज्ञ आरिफ मोहम्मद खान यांनी विद्यार्थ्यांना यशाचे महत्त्वपूर्ण गुरुमंत्र दिले.जटिल संकल्पना सोप्या पद्धतीने सांगितली.आरिफ खान यांनी आपल्या अनोख्या आणि आकर्षक सादरीकरण शैलीने भूगोलासारखा तांत्रिक विषय अत्यंत मनोरंजक पद्धतीने मांडला. नकाशा वाचन, हवामानाचे नमुने आणि संसाधन व्यवस्थापन यांसारख्या कठीण वाटणाऱ्या संकल्पना त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत स्पष्ट केल्या. त्यांच्या या 'जादुई' अध्यापन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमधील विषयाची भीती दूर होण्यास मदत झाली. व्याख्यानादरम्यान खान यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळवण्यासाठी काही महत्त्वाच्या टिप्स दिल्या. भूगोलात आकृत्यांना अनन्यसाधारण महत्त्व असून, त्या कशा सुबक काढाव्यात यावर त्यांनी मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांचा या संवादपर सत्रात विद्यार्थ्यांनी आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे परीक्षेला सामोरे जाण्यासाठी एक नवी ऊर्जा मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.शाळेच्या वतीने घेण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालक आणि शिक्षण क्षेत्रातून कौतुक होत आहे.

## महाराष्ट्र पोलीस स्थापना दिवस निमित्ताने दौलताबाद देवगिरी किल्ल्यावर पथनाट्यद्वारे जनजागृती



**दौलताबाद (जावेद अहमद) :** महाराष्ट्र पोलीस स्थापना ०२ जानेवारी १९६१ रोजी झाली आहे या निमित्ताने छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्त प्रवीण कुमार यांच्या संकल्पनेतुन व आदेशानुसार भरोसा सेलच्या पोलीस निरीक्षक सुनीता मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली दामिनी पथकाच्या पोलीस उपनिरीक्षक कांचन मिरधे यांनी दि ०७ दौलताबाद किल्ल्याच्या पायथ्याशी मौलाना आझाद महाविद्यालय च्या शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सोबत स्त्रीभ्रूण हत्या,मांजा मुळे होणारे दुष्परिणाम व पक्षाच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे,मोबाईल मुळे दुष्परिणाम, महिला व मुलींची होणारी छळवणूक याबाबत पथ्यनाट्य द्वारे जनजागृती करण्यात आलीयाबरोबरच किल्ल्यावर पर्यटनासाठी महाराष्ट्र तील आलेल्या अनेक शैक्षणिक सहलीतील शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी कलागुण सादर केले जिल्हा परिषद शाळा टाकळी तालुका शेवगाव जिल्हा अहिल्यानगर येथील वर्ग चौथीची विद्यार्थीनी नेहा हरिभाऊ शेटे हिने स्त्रीभ्रूण हत्या बाबत खूपच सुंदर पथनाट्य सादरीकरण करून उपस्थितांचे मने जिंकली तिला उपनिरीक्षक कांचन मिरधे यांनी बक्षीस देऊन सत्कार केलाछत्रपती संभाजीनगर शहरातील १९ ते २० वर्दळीच्या चौका चौकात विविध शाळा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पथनाट्य सादरीकरण करण्यात आले असल्याचे कांचन मिरधे यांनी सांगितले यावेळी दामिनी पथकाच्या सहायक पोलीस उपनिरीक्षक लता जाधव,कल्पना खरात, सुधाकर पवार, अंबिका दारूनटे, अवैध्या दौंड,पूजा जाधव,कविता गवळी,पूजा ढवळे, आशा तडवी,शरद बच्छाव, बंडू गोरे आदींची उपस्थिती होती

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन




**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात गणित विभाग व सारथी एज्युकेशन, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने बॅंकिंग, रेल्वे रिक्रुटमेंट, स्टाफ सिलेक्शन कमिशन (SSC) तसेच केंद्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांच्या संदर्भात मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. या चर्चासत्रामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना बॅंकिंग क्षेत्र, रेल्वे, SSC, इन्शुरन्स, नाबार्ड, रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडिया आदी क्षेत्रांमधील रोजगाराच्या उपलब्ध संधी, निघणाऱ्या जाहिराती, अभ्यासक्रम व परीक्षेच्या स्वरूपाची सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी सारथी एज्युकेशनचे श्री. राहुल मिसाळ यांनी स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असलेल्या गणित, बुद्धिमत्ता चाचणी, इंग्रजी व जनरल अवेअरनेस या चार प्रमुख विषयांची तयारी कशी करावी, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे म्हणाले की, कोविड काळात देखील बॅंकिंग व फार्मास्युटिकल क्षेत्र सुरूच राहिले नमूद केले. तसेच २०३० पर्यंत बॅंकिंग क्षेत्रात सुमारे अडीच लाख नोकऱ्या उपलब्ध होण्याची शक्यता व्यक्त करत विद्यार्थ्यांनी आपले नेमके करिअर ठरवून सातत्याने मेहनत घ्यावी.यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. कल्याण कुंभार, प्रा. विलास भुतेकर, डॉ. निलेश बर्डे, डॉ. रवींद्र शिंपी व प्रा. अक्षय चेडे, श्री. योगेश गुल्लापेल्ली यांची उपस्थिती होती.एकूण १३२ विद्यार्थ्यांनी या चर्चासत्रात सहभाग नोंदविला. चर्चासत्रानंतर विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना राहुल मिसाळ यांनी सविस्तर व समाधानकारक उत्तरे दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन व आभार प्रा. संदीप पाटील यांनी केले.

## कन्नड येथील सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयात रविवारी रंगणार आठवा राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सव

**कन्नड (प्रतिनिधी) :** कन्नड येथील सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय, त्रैमासिक तिफण आणि भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड यांच्या वतीने रविवारी (ता. ११ ) राज्यस्तरीय आठवा तिफण कविता महोत्सव रंगणार असून या महोत्सवात राज्यभरासह, स्थानिक कवी व कवितेचे अभ्यासक यांची उपस्थिती लाभणार आहे. सकाळी ठिक १० वा. उदघाटन होणार असून अध्यक्ष स्थानी ज्येष्ठ शेतकरी कवी नारायण सुमंत तर उद्घाटक कवी राजेंद्र दिघे, विशेष अतिथी म्हणून श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, उद्योजक मानसिंह पवार, प्राचार्य डॉ. विजय भोसले, ॲड. कृष्णा जाधव, डॉ. सीताराम जाधव, सागर जाधव, डॉ. अंबादास सगट, डॉ. रमेश सूर्यवंशी, प्रा. रंगनाथ लहाने, डॉ. प्रतिभा अहिरे,शरद भिंगारे , डॉ. सर्जेराव जिगे, डॉ. दिलीप बिरुटे, प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर, राजानंद सुरडकर, डॉ. मोहन सौंदर्य, डॉ. युवराज धबडगे, डॉ. सुधाकर जाधव, डॉ. संजय गायकवाड, गणेश घुगे, बाबासाहेब मोहिते, अशोकसिंह शेवगण, सुनील डोके यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या कविता महोत्सवात सात पुस्तकांचे व तिफण लोकवाङ्मय विशेषांकाचे प्रकाशन, चित्रकाव्य प्रदर्शन, दोन कविसंमेलन, तिफण राज्यकाव्य पुरस्कार वितरण असे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. निमंत्रित कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी प्रतिभा खैरनार तर स्थानिक कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी पंजाबराव मोरे हे राहणार असून विठ्ठल शिरसे यांची उपस्थिती राहणार आहे. राज्यभरातील कवी सहभागी होणार आहेत. या कविता महोत्सवाचा कवी, समीक्षक, रसिक आणि वाचक यांनी लाभ घ्यावा असे आवाहन स्वागताध्यक्ष रामकृष्ण पवार, संयोजक डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रुपेश मोरे, डॉ. रामचंद्र झाडे, संजय जाधव, प्रविण दाभाडे, अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, भिमराव सोनवणे, संदीप ढाकणे, अनिता राठोड, भगवानराव लहाने, ब्रम्हगिरी गोस्वामी, का. का. थोरात, श्रीराम दापके, सुरेश औटे, अजय दवंडे, शुभदा देवरे, गीतांजली गजबे,अमोल मोकासे, भरत सोनवणे, संदीप वाकडे, अपर्णा धाटबळे, प्रकाश शहरवाले, नाना लहाने, रायभान जाधव, विवेकानंद सुकाळे, शिवनाथ गायकवाड, आदिंनी केले आहे.


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ८ जानेवारी २०२६


## समृद्धी महामार्गावर थरार चालती स्विफ्ट कार पेटली



**दौलताबाद (जावेद अहमद) :** 1दि ०७ बुधवार रोजी सकाळी साडे अकरा वाजता समृद्धी महामार्गावर दौलताबाद पोलिस स्टेशन हद्दीतील माळीवाडा चॅनेल क्र 440.8 ते440.9 येथे स्विफ्ट कार क्र MH10 BA 5762 जालना कडून धुळे कडे जात असताना हा अपघात झालाजालना येथून स्विफ्ट चालक स्वप्नील लघाणे वय ३५ वर्ष याने भरत अण्णासाहेब शिंदे वय ४५ त्यांचे वडील अण्णासाहेब किसन शिंदे वय ७५,आई सविता अण्णासाहेब शिंदे वय ७० वं मुलगा सुयोग भरत शिंदे वय २५ वर्ष सर्व राहणार चंदणझिरा जिल्हा जालना येथून धुळे येथे एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी जालना येथून निघाले समृद्धी महामार्गावर माळीवाडा येथील चॅनल क्र 440.8 जवळ जात असताना कार च्या बोनेट मधून अचानक धूर निघत असल्याने कार चालकाने प्रसंगावधन राखून कार रस्त्याच्या बाजूला उभी केली व चौघांना सुरक्षित खाली उतरून दिलेत्याचवेळी बाजूला जाणाऱ्या एका वाहन चालकाणे समृद्धी महामार्ग हेल्पलाईन वर सदर घटनेची माहिती दिली माहिती मिळताच अति जलद गतीने महामार्ग अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले त्यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले पण आगीने रौद्र रूप धारण केले होते पाहता पाहता कार जळून खाक झाली आहे कार जळत असताना त्याचे टायर जळून मोठे आवाज ऐकून उपसरपंच मणेश गाजरे,ग्रा प स प्रवीण बर्डे व परिसरातील शेतकरी मदतीला धावून आले होतेकार मधील आग ही वायर शॉर्ट सर्किट मुळे लागली असल्याचे संशय वर्तविण्यात येत आहे कारण ही डिझेल कार होती घटनेची माहिती दौलताबाद पोलिसांना मिळताच पोलीस अंमलदार कैलास काकडे, फकिरा तडवी,परिवहन अधिकारी केतकी वडमोरे, महामार्ग पोलीस उपनिरीक्षक गजानन लाहसे व कर्मचारी यांनी घटनास्थळी

## प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल मध्ये पत्रकार जगदीश सुरवसे यांचा सन्मान




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल मध्ये मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून पत्रकार दिन मंगळवारी (ता. ६) रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक सच्चिदानंद अंबर होते. प्रारंभी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी दै. सकाळ अचलेरचे पत्रकार जगदीश सुरवसे यांचा प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला. गेल्या १२ वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात जगदीश सुरवसे हे समाजहित डोळ्यासमोर ठेवून वस्तुनिष्ठ वृत्तांकन करत पत्रकारितेची विश्वासार्हता जपली आहे. त्यांच्या या निष्ठावंत व उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन हा सन्मान करण्यात आला. यावेळी सच्चिदानंद अंबर यांनी आपल्या मनोगतातून पत्रकारितेचे सामाजिक महत्त्व, सत्यता व मूल्याधिष्ठित लेखन यावर प्रकाश टाकला. शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा जोशी यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की, पत्रकार हा समाजाचा आरसा असून त्यांच्या लेखणीतून सामाजिक परिवर्तन घडते. सत्काराला उत्तर देताना सुरवसे यांनी पत्रकारितेतील अनुभव कथन करून बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. प्रास्ताविक पंकज पाताळे यांनी केले. सुत्रसंचलन व आभार शिक्षिका साक्षी देशमाने यांनी मानले. यावेळी शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद, विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलमध्ये जगदीश सुरवसे यांचा सत्कार करताना सच्चिदानंद अंबर, अनुराधा जोशी व शिक्षकवृंद.

## ज्ञानेश्वर विद्यालयात क्रीडा सप्ताहाची सांगता; कै. पंढरीनाथ पाटील यांना अभिवादन



**बेगमपुरा :** येथील ज्ञानेश्वर विद्यालय, बेगमपुरा येथे कैलासवासी पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ शिसोदे यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा सप्ताहाचा समारोप आज अत्यंत उत्साहात पार पडला. या निमित्ताने आयोजित विविध स्पर्धांमधील विजेत्या खेळाडूंचा आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. मान्यवरांची उपस्थिती आणि प्रतिमा पूजन कार्यक्रमाच्या सुरुवातीला कै. पंढरीनाथ पाटील शिसोदे (भाऊ) यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. संभाजी तांगडे उपस्थित होते. अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा जागर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती मंगल पवार यांनी केले. यामध्ये त्यांनी क्रीडा सप्ताहाच्या आयोजनामागची भूमिका मांडली. त्यानंतर श्री. भारत झोडपे यांनी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आद्य संस्थापक कै. पंढरीनाथ पाटील शिसोदे उर्फ भाऊ यांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकला. भाऊंचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान आणि त्यांचे आदर्श विचार आजही विद्यालयासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

आदर्श विद्यार्थी व निबंध स्पर्धा पारितोषिक वितरण या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीच्या 'आदर्श विद्यार्थी' पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. तसेच, 'लोकमत' पुरस्कृत 'आम्ही सावित्रीच्या लेकी' व 'स्टार प्रवाह' वाहिनीच्या वतीने आयोजित 'माझ्या आयुष्यातील सावित्रीबाई' या विषयावरील निबंध स्पर्धेतील विजेत्यांनाही मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

अध्यक्षीय मार्गदर्शन: माहिती व तंत्रज्ञानाचा वापर कार्यक्रमाचा समारोप करताना मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून कै. पंढरीनाथ पाटील शिसोदे (भाऊ) यांच्या कार्याची महती सांगत त्यांचे आपल्या आयुष्यातील महत्त्व पटवून दिले. तसेच, "सध्याच्या आधुनिक युगात माहिती व संप्रेषण (Information and Technology) चा उपयोग विद्यार्थ्यांनी आपल्या अध्ययनासाठी आणि प्रगतीसाठी कसा करावा," याविषयी त्यांनी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन व आभार कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन श्रीमती मंगला सुलताने यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. रवींद्र साठे यांनी मानले. यावेळी शाळेतील शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ८ जानेवारी २०२६


## इंग्रजी ही मॅकॉलेची नव्हे, तर आंबेडकरांची भाषा आहे. ती भारतीय आणि दलित-बहुजन मुक्तीची भाषा आहे.

**उ**च्चवर्णीय आणि श्रीमंत वर्ग महागड्या खासगी संस्थांमधून इंग्रजी शिकू शकतो; पण त्याचा फटका बहुजन समाजालाच बसणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आणि भारतीय जनता पक्ष (भाजप) यांनी दलित/शूद्र/आदिवासींच्या भवितव्यावर हल्ला करण्याची आणखी एक आघाडी उघडली आहे. या आघाडीचा मुसलमानांशी काहीही संबंध नाही. एका अर्थाने ती ख्रिश्चनविरोधी वाटत असली, तरी भारतातील ख्रिश्चन लोकसंख्या संख्येने कमी असल्याने त्यांच्या भवितव्यावर तिचा फारसा परिणाम होत नाही. ही आघाडी म्हणजे इंग्रजी शिक्षण.जरी त्यांचा हल्ला वसाहतवाद आणि लॉर्ड थॉमस बॅबिंग्टन मॅकॉले यांच्यावर असल्याचे भासवले जात असले, तरी प्रत्यक्षात तो हल्ला दलित/शूद्र/आदिवासींच्या इंग्रजी शिक्षणावर आहे. हे लोक हळूहळू इंग्रजी शिकत आहेत आणि सर्व राज्यांत तसेच राष्ट्रीय पातळीवर उच्चवर्णीयांशी स्पर्धा करण्याची आशा बाळगत आहेत. इंग्रजीमुळे त्यांना जागतिक बाजारपेठेत प्रवेशही मिळतो आहे. ही भाषा त्यांच्या आयुष्यात मॅकॉलेमुळे नव्हे, तर महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे आली.स्वातंत्र्यलढ्याच्या काळात तसेच संविधान आणि ग्रंथलेखनात इंग्रजीवर असाधारण प्रभुत्व दाखवून आंबेडकरांनीच त्यांना आत्मविश्वास दिला. या भाषेच्या माध्यमातून ऐतिहासिक गुलामगिरीतून मुक्ती मिळू शकते, हे त्यांनी दडपलेल्या जातींना दाखवून दिले. हजारो वर्षे संस्कृतचा वापर दलित/शूद्रांना गुलाम बनवण्यासाठी करण्यात आला. त्याच्या विरोधात इंग्रजी ही दडपल्या-शोषितांच्या हातातील प्रतिकाराची शस्त्रे ठरली.आज आरएसएस/भाजप पद्धतशीरपणे ओबीसी पार्श्वभूमीच्या नरेंद्र मोदींना पंतप्रधानपदावर ठेवून या जातींना इंग्रजीपासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. शूद्र मेंढपाळ समाजातून आलेला पहिल्या पिढीचा इंग्रजी लेखक म्हणून मला इंग्रजीची मुक्तिदायी ताकद ठाऊक आहे. आमच्यासाठी इंग्रजी ही मॅकॉलेची नव्हे, तर आंबेडकरांची भाषा आहे. ती भारतीय आणि दलित-बहुजन मुक्तीची भाषा आहे.ही ख्रिश्चन भाषा का नाही?तेलंगणाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, रोजगार, राजकीय आणि जातीय सर्वेक्षणातून असे दिसते की, ख्रिश्चन लोकसंख्या संख्येने कमी असली तरी त्यांचे इंग्रजी शिक्षण ब्राह्मण, रेड्डी आणि कम्मा समाजाइतकेच आहे. चर्च व्यवस्थेने अनेक ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्यामुळे हे शक्य झाले. मात्र त्यांच्यासाठी इंग्रजी ही नोकरी किंवा प्रार्थनेची भाषा होती.भारतामधील कोणत्याही ख्रिश्चन विद्वानाने इंग्रजीचा वापर आंबेडकरांप्रमाणे मुक्तीच्या साधन म्हणून केला नाही. आंबेडकर ख्रिश्चन नव्हते; त्यांच्यासाठी इंग्रजी ही दडपल्या-शोषितांचे आयुष्य बदलू शकणारी भाषा होती.हेही खरे आहे की फारसे शूद्र/ओबीसी ख्रिश्चन झाले नाहीत आणि त्यांनी मुलांना ख्रिश्चन इंग्रजी शाळांत पाठवले नाही. उलट काही उच्चवर्णीय, विशेषतः ब्राह्मण, ख्रिश्चन झाले आणि बहुतेक हिंदू उच्चवर्णीयांनी आपल्या मुलांना ख्रिश्चन शाळांत इंग्रजी शिकायला पाठवले. आजच्या भारतात ब्राह्मण, बनिया, कायस्थ, खत्री आणि क्षत्रिय हे इंग्रजीत सर्वाधिक शिक्षित अभिजन आहेत. मात्र त्यांनीही या भाषेचा वापर जातीय दडपशाहीतून मुक्तीसाठी केला नाही.अलीकडे शूद्र-ओबीसींना जाणवू लागले आहे की, आंबेडकरांच्या इंग्रजी लिखाणामुळेच आरक्षणाचे लाभ मिळाले आणि इंग्रजी शिकण्याचे महत्त्व कळले.तेलंगण सर्वेक्षणानुसार इंग्रजी शिक्षणाच्या निकषांमध्ये सर्वाधिक मागास आदिवासी, त्यानंतर दलित आणि ओबीसी आहेत. सर्वाधिक इंग्रजी शिक्षित म्हणून अय्यंगार/अय्यर आणि ब्राह्मण पुढे आहेत. खासगी शाळांचे उच्च शिक्षणही यांच्याच वाट्याला गेले आहे. ऐतिहासिकदृष्ट्या हे समाज विशेषाधिकारित होते; पूर्वी त्यांनी संस्कृत आणि फारसीवरही वर्चस्व ठेवले होते. श्रीमंत मुसलमानांकडे उर्दू, अरबी, फारसी आणि इंग्रजी आहे. तरीही या भाषांचा उपयोग त्यांनी दडपलेल्या जातींच्या मुक्तीसाठी केला नाही.आपल्या काळातील इंग्रजीतेलंगण सर्वेक्षणातून असेही स्पष्ट झाले आहे की शूद्र/ओबीसी/दलित/आदिवासींचा सर्वांगीण विकास जमिनीपेक्षा इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाशी अधिक जोडलेला आहे. लग्न ठरवतानाही इंग्रजी शिक्षित उमेदवार शोधला जातो. म्हणूनच राज्यातील सरकारी शाळा इंग्रजी माध्यमात रूपांतरित केल्या जात आहेत. ही दृष्टी आंबेडकरांच्या उत्तर-वसाहतवादी काळातील मुक्तीच्या संघर्षातून आली. इतर कोणत्याही स्वातंत्र्यसैनिकाचा त्यांच्या घरांवर आंबेडकरांइतका प्रभाव पडलेला नाही.आंबेडकर उच्चवर्णीयांसाठी गांधींसारखे नाहीत, बंगाली भद्रलोकांसाठी रवींद्रनाथ टागोरांसारखे नाहीत, किंवा मुस्लीम विभाजनवाद्यांसाठी जिन्नांसारखे नाहीत. ते दडपल्या जातींसाठी सुधारक, नवी भाषा शिकवणारे शिक्षक, रोजगाराचे स्रोत आणि दैवी प्रेरणा आहेत. काठावरच्या जातींमधील कोणालाही मॅकॉले त्यांच्या आयुष्यातील इंग्रजीचा स्रोत वाटत नाही; त्यांना आंबेडकरच इंग्रजी शिक्षण, रोजगार आणि न्यायालयीन संरक्षणाचे स्रोत वाटतात. तरीही आरएसएस/भाजपांची मॅकॉले-विरोधी उन्मादक भूमिका त्यांच्या आयुष्यावर गंभीर परिणाम करणार आहे.मॅकॉले उन्मादआरएसएस/भाजपांचे नेते इंग्रजी शिक्षणाची ओळख मॅकॉलेशी का जोडत आहेत? संसदेत ‘वंदे मातरम्’ विरुद्ध ‘जन गण मन’ या वादातही संस्कृत-केंद्रित आणि प्रादेशिक भाषाविरोधी कल दिसून आला. मॅकॉलेविरोधी मोहिम आणि संस्कृत/हिंदीला प्राधान्य देत प्रादेशिक भाषांना दुय्यम ठरवणे ही दीर्घकालीन फसवी नीति आहे.आरएसएस/भाजप नेतृत्व हळूहळू सरकारी शाळांतील इंग्रजी शिक्षण कमकुवत करून दलित/शूद्र/आदिवासींची जागतिक गतिशीलता रोखण्याचा प्रयत्न करत आहे; मात्र श्रीमंत वर्गासाठी खासगी इंग्रजी शिक्षणाला त्यांचा विरोध नाही.आंबेडकरांनी सर्व प्रमुख ग्रंथ इंग्रजीत लिहिले; त्यांचे संविधान सभेतील भाषणही इंग्रजीतच होते. एका अस्पृश्य समाजातील पहिल्या पिढीतील व्यक्तीने इंग्रजीमुळेच देशभर प्रभाव टाकला. त्यांच्या इंग्रजी लिखाणाचे सर्व भारतीय भाषांत भाषांतर झाले आणि ते मुक्तीचे साधन ठरले. आज हीच भाषा काढून घेऊन आरएसएस/भाजप या समुदायांना अशक्त करू पाहत आहेत.आपली भावी राष्ट्रीय भाषा म्हणून इंग्रजीभारत एकभाषिक देश नाही. अनेक जाती, समुदाय, जमाती आणि प्रादेशिक भाषा येथे आहेत. परस्पर संवादासाठी एक राष्ट्रीय भाषा हवी—ती इंग्रजी असली पाहिजे. पण आरएसएस/भाजप हिंदी लादू पाहतात, तर श्रीमंतांना इंग्रजी वापरू देतात. दलित/आदिवासी/ओबीसींनी इंग्रजी शिकली नाही तर ते शतकानुशतके दडपलेलेच राहतील—ही ताकद सत्ताधाऱ्यांना माहीत आहे.इंग्रजीला वसाहतवाद आणि मॅकॉलेशी जोडणे हा जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न आहे. मॅकॉलेचा उद्देश “रक्ताने भारतीय पण अभिरुची-मत-नीती-बुद्धीने इंग्रजी” असा वर्ग तयार करण्याचा होता. प्रत्यक्षात या वर्गात कोण आले? इंग्लंडमध्ये शिकून इंग्रजीत ग्रंथ लिहिणारे सावरकर दलित-शूद्रांच्या मुक्तीसाठी नव्हे, तर हिंदुत्ववादी राष्ट्रराज्याच्या सिद्धांतासाठी ओळखले जातात.

कांचा इलैय्या शेफर्ड हे राजकीय विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक आहेत.

**मराठी अनुवाद : प्रा. प्रियदर्शन भवरे**

**पूर्वप्रसिद्धी : द वायर १८ डिसेंबर २०२५**

## लोकशाही जिवंत ठेवण्याचे काम पत्रकार करतात - अमृता नागरे




**जिंतूर :** अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाच्या वतीने दिनांक ६ जानेवारी रोजी पत्रकार भवन, जिंतूर येथे मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दर्पण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या अमृता नागरे यांनी मार्गदर्शन करताना, लोकशाही जिवंत ठेवण्याचे महत्त्वाचे काम पत्रकार करतात असे प्रतिपादन केले.कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून जेष्ठ पत्रकार निहाल अहेमद हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे,लक्ष्मण बुधवंत,डॉ निशांत मुंढे,शेख अहेमद, अकबर सिद्दीकी,पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर,अजमत पठाण,एकनाथ चव्हाण,शेख नयमुद्दीन हे उपस्थित होते यावेळी जेष्ठ पत्रकारांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला.यावेळी त्या पुढे म्हणाल्या की,आजच्या काळात सोशल मीडिया आणि एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) यांच्या माध्यमातून फोटो एडिट करून वास्तवाचे वरवरचे चित्र सादर केले जाते. मात्र, अशा परिस्थितीतही पत्रकार सत्य, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीने बातम्या मांडण्याचे आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत आहेत, हे समाजासाठी आशादायक आहे. पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नसून समाजाच्या हितासाठी केलेली जबाबदारीची सेवा आहे,असेही त्यांनी स्पष्ट केले.दर्पण दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमात पत्रकारितेचे सामाजिक योगदान,बदलते माध्यमविश्व आणि पत्रकारांची जबाबदारी यावर सखोल चर्चा झाली. उपस्थित इतर मान्यवरांनी आपले अनुभव मांडत पत्रकारितेतील आव्हाने आणि संधी यावर विचार व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख शकील यांनी केले तर आभार सिराज सिद्दीकी यांनी मानलेहा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास तालुक्यातील पत्रकार बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103 8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ८ जानेवारी २०२६


## मनपा सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी २०२६ मतदान जनजागृती रॅली व पथनाट्य सादर



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदान जनजागृतीसाठी महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी माननीय श्री. जी. श्रीकांत साहेब व उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख माननीय श्री. अंकुश पांढरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी मतदान जनजागृती पथनाट्य आयोजित करण्यात आले.या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी मुकुंदवाडी परिसरातील प्रमुख चौकांमध्ये रॅली काढून मतदानाचे महत्त्व सांगणारे पथनाट्य श्रीमती पंडित मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केले. या पथनाट्याला पालकवर्ग व स्थानिक मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.या कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी माननीय श्री. ज्ञानदेव सांगळे सर, शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री. चौधरी सर तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता वाढल्याचे दिसून आले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाळणाऱ्यांवर देशद्रोहाची कारवाई करा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाळण्याची घृणास्पद व देशद्रोही घटना घडल्याच्या निषेधार्थ पुरोगामी महाराष्ट्रासाठी या सामाजिक व पुरोगामी विचारसरणीच्या संघटनांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व गृहमंत्री यांच्याकडे तीव्र निषेध नोंदवत कठोर कारवाईची मागणी केली आहे. यासंदर्भात तहसीलदार जिंतूर यांच्यामार्फत राज्य सरकारला निवेदन सादर करण्यात आले आहे.मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर येथे अनिल मिश्रा व त्याच्या टोळीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाळल्याची घटना समोर आली असून, ही कृती अत्यंत घृणास्पद, समाजद्रोही व देशद्रोही असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ही घटना केवळ एका महापुरुषाचा अपमान नसून भारतीय संविधान, सामाजिक समता, बंधुता व लोकशाही मूल्यांवर केलेला थेट हल्ला असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, यापूर्वीही संबंधित व्यक्तींनी महापुरुषांच्या पुतळ्यांचा विरोध करणे, समाजात तेढ निर्माण करणे व सतत चिथावणीखोर कृती करणे असे प्रकार केले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाळण्याची घटना देशातील शांतता व सामाजिक सलोखा बिघडवणारी असून, अशा कृत्यांमुळे गंभीर परिणाम होऊ शकतात.सदर फोटो जाणूनबुजून सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आल्याने महामानवांच्या अनुयायांची भावना दुखावली असून, AI व डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भविष्यात अशा प्रतिमांचा विकृत व धोकादायक वापर होण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.मुख्य मागण्या :सदर कृत्य करणाऱ्या अनिल मिश्रा व त्याच्या टोळीला देशद्रोही घोषित करण्यात यावे.संबंधित आरोपींवर UAPA सारख्या कठोर कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून तात्काळ अटक व खटला चालवावा.डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच इतर महापुरुषांच्या प्रतिमा जाळणे, विटंबना करणे किंवा अवमान करणाऱ्यांसाठी BNS अंतर्गत स्वतंत्र व कठोर कायद्याची तरतूद करण्यात यावी.अशा समाजद्रोही प्रवृत्तींविरोधात राज्य व केंद्र सरकारने स्पष्ट व कठोर भूमिका जाहीर करावी.देशातील शांतता व सामाजिक एकोपा बिघडवणाऱ्या कृत्यांवर 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवावे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोट्यवधी भारतीयांचे प्रेरणास्थान असून त्यांच्या विचारांवरच आजचा भारत उभा आहे. त्यांच्या प्रतिमेची विटंबना कदापि सहन केली जाणार नाही, अशी भूमिका संघटनांनी घेतली आहे. शासनाने तात्काळ कठोर कारवाई न केल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## कन्नड तालुका पत्रकार संघाच्या कार्याध्यक्षपदी राजानंद सुरडकर



**कन्नड (अरुण थोरात):** दर्पण दिन व पत्रकार दिनानिमित्त सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय कन्नड येथे आयोजित बैठकीत कन्नड तालुका पत्रकार संघाची नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली असून कार्याध्यक्ष पदी जेष्ठ पत्रकार राजानंद सुरडकर, अध्यक्षपदी विठ्ठल शिरसे यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, कन्नड तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष स्व. सुरेश केवट यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जेष्ठ पत्रकार राजानंद सुरडकर, संजय जाधव, यांनी मनोगत व्यक्त केले.यानंतर बैठकीत कन्नड तालुका पत्रकार संघाची नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली. त्यानूसार कार्याध्यक्ष- राजानंद सुरडकर, अध्यक्ष- विठ्ठल शिरसे, उपाध्यक्ष- अनिल शिरसाठ, आर.एस.पवार, सचिव- शेख ईलियास, सहसचिव- शेख अकीब, कोषाध्यक्ष- मुजीब खान, सदस्य- अनिल गायकवाड, राजेंद्र नेवगे, अभिषेक देशमुख, किशोर क्षीरसागर, विशाल भालेराव, संतोष खाजेकर, सल्लागार- प्रा. डॉ. शिवाजी हुसे, संजय जाधव, संजय केवट, रविंद्र अजमेरानूतन कार्यकारिणीचे कन्नड च्या नगराध्यक्षा फरीन शेख यांनी सत्कार करीत अभिनंदन केले.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.



दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ८ जानेवारी २०२६


## खरंच आठवणी पुसल्या जातील?



लातूर महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 च्या प्रचार सभेत एका राजकीय पक्षाच्या जबाबदार नेत्याने आपल्या भाषणात महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कैलासवासी विलासराव देशमुख यांच्या लातूर मधील आठवणी शंभर टक्के पुसल्या जातील अशा प्रकारचे वक्तव्य केले आणि लातूरमध्ये सर्व लोकांच्या मनामध्ये असंतोष व अस्वस्थता निर्माण झाली.मात्र ही चूक लक्षात आल्यानंतर त्या नेत्याने लगेच दूरदर्शनच्या माध्यमातून जाहीरपणे माफीही मागितली. त्याचाच परिणाम म्हणून आज लातूर व बाभुळगाव बंदचे हाक लोकांनी दिली. आपल्या देशात स्वातंत्र्यपूर्व काळात तसेच स्वातंत्र्योत्तर काळात अनेक महान समाजसेवक व राजकीय नेते होऊन गेले, त्यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय स्तरावरील महात्मा गांधी, सुभाष चंद्र बोस, शहीद भगतसिंग, मदनलाल धिंग्रा,बाबू गेनू, जवाहरलाल नेहरू सरदार वल्लभाई पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इंदिरा गांधी, राजीव गांधी, अटल बिहारी वाजपाई तर महाराष्ट्र राज्य स्तरावरील यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, वसंत दादा पाटील, शरदचंद्र पवार, विलासराव देशमुख यासारखे अनेक दिग्गज नेत्यांनी राष्ट्राच्या, राज्याच्या, समाजाच्या हितासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र कष्ट केले. त्यामुळेच तर आज त्यांचे फोटो बहुतेक घरामध्ये दुकानांमध्ये शासकीय अशासकीय व खाजगी कार्यालयामध्ये लावलेले आपल्याला दिसतील अनेक ठिकाणी तर त्यांना देवता मानून त्यांच्या फोटोची दररोज उदबत्ती लावून पूजा करून व दर्शन घेऊन आपल्या कामाला सुरुवात केली जाते आजही आपण अकलूजला गेलात तर सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्य, सदस्य प्रवरा नगरला गेलात तर पद्मश्री विखे पाटील, बारामतीला गेलात तर माजी मुख्यमंत्री व राष्ट्रीय नेते शरदचंद्र पवार आणि लातूरला गेलात तर माजी उपमुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे फोटो बहुतेक घरात, दुकानात, शासकीय व अशासकीय तसेच अगदी खाजगी कार्यालयातही लावलेले आढळतील ते उगीच लावलेले नाहीत. त्यांच्या कार्यामुळे त्यांच्या आठवणी, त्यांच्या प्रतिमा त्या त्या भागातील लोकांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या आहेत."विलासराव देशमुख यांच्या आठवणी लातूर मधून१००% पुसून टाकणार" या वक्तव्यावर त्यांचे सुपुत्र माजी मंत्री अमित देशमुख व दुसरे सुपुत्र सिनेअभिनेता ऋतिक देशमुख यांनी अत्यंत संयम राखून शांतपणे अत्यंत मोजक्या शब्दात दिलेल्या प्रतिक्रिया मधून त्यांच्या आई-वडिलांचे त्यांच्यावर झालेले संस्कार व घराण्याच्या संस्कृतीची झलक आपल्याला पाहायला मिळते. यासंबंधी अगदी एक ओळीत प्रतिक्रिया देताना विलासराव देशमुख यांचे चिरंजीवरितेश देशमुख म्हणाले *दोन्ही हात वर करून सांगतो लोकांसाठी घडलेल्या माणसाची नावे मनावर कोरली असतात लिहिलेलं पुसता येतं परंतु कोरलेले नाही. मी काही राजकारणी नाही सर्वसामान्य एक ज्येष्ठ नागरिक आहे. परंतु हे सर्व चाललेलं माझे मन व्यतीत झाले. राजकारण कोणत्या स्तरापर्यंत जात आहे, त्याची पातळी आणखी किती खाली जाणार याची चिंता उगीचच मनाला लागून गेली म्हणून हा लेख लिहिण्याचा प्रपंच केला.कोणी विचारल्याशिवाय सल्ला देऊ नये असे म्हणतात. परंतु गाठलेला एक ज्येष्ठ नागरिक म्हणून राजकीय पुढाऱ्यांना व इतर सर्वांनाच असा सल्ला देऊ इच्छितो की बोलताना शंभर वेळा विचार करा आपल्या बोलल्यामुळे त्याचा विपरीत परिणाम आपल्यावरच होईल बुम रॅंग होईल का?उगीचच संतांनी लिहिले नाही की शब्द हे शस्त्र आहे जपून वापराशस्त्राने झालेली जखम भरून होऊ शकते परंतु शब्दाने झालेली जखम वर्षानुवर्ष भरून येत नाही हे मात्र खरे.विलासराव देशमुख हे फक्त लातूरची किंवा मराठवाड्याची अस्मिता नसून संपूर्ण महाराष्ट्राची अस्मिता आहे आणि या अस्मितेला ठेस लागली तर लोक सहन करणार नाहीत. विलासरावांवर महाराष्ट्र ने किती प्रेम केलं हे त्यांच्या अंत्ययात्रेसाठी जमलेल्या जमावाने सर्वांना दाखवून दिलेले आहे. त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांचे बंधू माननीय माजी मंत्री दिलीपराव देशमुख, आमदार अमित देशमुख,आमदार धीरज देशमुख सिने अभिनेता रितेश देशमुख यांच्या पाठीशी लातूर व परिसरातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील जनता खंबीरपणे उभी राहिलेली दिसते.आम्ही शाळेत शिकत असताना आमचे शिक्षक फळ्यावर पखडूने एक खूप उंच रेषा ओढायचे आणि त्याच्या शेजारी दुसरी अत्यंत खुजी रेषा ओढायची आणि प्रत्येक विद्यार्थ्यांना समोर बोलावून प्रश्न विचारायचे की उंच रेषेपेक्षा खुजी रेषा मोठी करायची असेल तर काय करता येईल? प्रत्येक विद्यार्थी आपापल्या बुद्धिमत्ते प्रमाणे व कुवती प्रमाणे विचार करून याचे उत्तर द्यायचा. एका मुलाने पुढे जाऊन लांब रेषा पुसून अत्यंत छोटी केली आणि सांगितले बघा गुरुजी छोटी रेषा आता मोठी झाली आहे. तर दुसऱ्या मुलाने मात्र पुढे जाऊन छोटी रेषा मोठ्या रेषा पेक्षाही उंच केली. या दोन प्रकारच्या नकारात्मक व सकारात्मक प्रवृत्ती सर्वत्र आढळतील. म्हणून शेवटी एक जबाबदार नागरिक म्हणून एवढेच सांगू इच्छितो की जर आपल्याला मोठे व्हायचं असेल तर मोठमोठ्या लोकांनी कोणती कामे केली? लोक त्यांना मोठे का म्हणतात ? लोकांनी त्यांना डोक्यावर का घेतले ? याचा अभ्यास करा व आपणही त्यापेक्षा मोठे होण्याचा प्रयत्न करा. इतरांना नावे ठेवून त्यांना कमी लेखून किंवा त्यांचे प्रतिमा पुसून आपण कधीही मोठे होऊ शकत नाही हे मात्र निश्चित. या निमित्ताने ज्या थोर नेत्यांनी राष्ट्रासाठी व राज्यासाठी आपले आयुष्य समर्पित केले आहे त्या सर्वांना विनम्र अभिवादन करतो. धन्यवाद. जय महाराष्ट्र

**डॉ. आबासाहेब देशमुख**, पुणे.




## साहित्याचे तत्त्वज्ञान दलित साहित्यांनी मंडित केले आहे -प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे



छत्रपती संभाजीनगर : डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद आयोजित व डॉ मोहन सौंदर्य लिखित 'दलित आत्मकथने मूल्यविचार'या पुस्तकं प्रकाशना चा कार्यक्रम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय येथे संपन्न झाला. या ग्रंथावर बोलताना डॉ. ऋषीकेश कांबळे म्हणाले,डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानात जी आक्रमकता होती त्याच आक्रमकतेतील प्रेरणेने दलित साहित्यात आत्मकथनांची निर्मिती करून दिली. आंबेडकरी साहित्याचे तत्त्वज्ञान जगासमोर मांडण्याचे काम दलित आत्मकथनकारांनी केले असून त्या आत्मकथनातील मूल्यविचार डॉ. मोहन सौंदर्य यांनी आपल्या ग्रंथात अधोरेखित केल्याने त्यांचे पुस्तक केवळ संदर्भ ग्रंथ नसून नव्या संशोधकांना संविधानातील मौलिक विचारांनीची जाणीव करून देणारा एक समीक्षा ग्रंथ असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध समीक्षक तथा आंबेडकरी विचारवंत डॉ ऋषिकेश कांबळे यांनी डॉ. मोहन सौंदर्य लिखित दलित आत्मकथने :मूल्यविचार या ग्रंथावर भाष्य करताना केले. यावेळी मंचावर प्रकाशन समारंभाचे अध्यक्ष डॉ. वासुदेव मुलाटे, स. सो. खंडाळकर,प्रा.डॉ. नवनाथ गोरे,प्राचार्य डॉ. निशिकांत आलटे लेखक प्रा. डॉ.मोहन सौंदर्य,प्रल्हाद गायगोळे, बापूसाहेब सोनवणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेचे सचिव तथा प्रकाशक प्रा डॉ युवराज धबडगे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.कांबळे म्हणाले की पहिली कवयित्री इंदू कांबळे,जलसाकार केरूबुवा घेगडे सारख्या असंख्य कवी, आत्मकथनकारांनी या साहित्याला खूप उंचीवर नेले आहे. त्या स्वरूपाची मौलिक अभिरुची या पुढच्या काळात घडविण्यासाठी डॉ. सौंदर्य सारख्या लेखकांनी आपली लेखणी झिजवावी असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले. या कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने करण्यात आली लेखक म्हणून आपली भूमिका मांडताना डॉ मोहन सौंदर्य यांनी या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे तथागत बुद्धांचे प्रज्ञा,शील,करुणा तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानातून मानवी विकासाला पोषक असणारे समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या तत्वांचा मौलिक विचारच माझ्या ग्रंथाचा मूळ गाभा असल्याचे प्रतिपादन केले. डॉ. युवराज धबडगे यांनी प्रकाशकाची भूमिका विशद केली सुरुवातीला जेष्ठ पत्रकार मा. स. सो.खंडाळकर यांनी आत्मकथनांची वाचन संस्कृती पुन्हा आत्मसात करण्यासाठी लेखकांनी महत्त्वाची भूमिका बजावावी असे आवाहन करून या ग्रंथाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी लेखकाचं मन:पूर्वक कौतुकही केले. यावेळी प्राचार्य डॉ निशिकांत आलटे यांनी या ग्रंथावर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की काळानुसार आंबेडकरी आत्मकथनातील मूल्य अभ्यासण्याची गरज निर्माण झालेली आहे. ही गरज मोहन सौंदर्य यांनी त्यांच्या व्यासंगातून पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या ग्रंथावर भाष्य करत असताना डॉ. नवनाथ गोरे यांनीही आपली भूमिका विशद केली ते म्हणाले की आंबेडकरी तत्त्वज्ञानात असणारी मूल्य ही समता, बंधुता व न्याय या मूल्यांना समृद्ध करणारी आहेत. यावेळी बापू सोनवणे म्हणाले याग्रंथातील मुल्याचा सामाजिक माध्यमातून प्रसार केला पाहिजे, तर डॉ.सर्जेराव जिगे म्हणाले दलित आत्मकथने :मूल्यविचार या ग्रंथामध्ये प्रस्थापित साहित्य मूल्य नाकारून नवीन साहित्य मूल्यांची म्हणजेच समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, वैज्ञानिकता या साहित्य मूल्यांची मांडणी डॉ मोहन सौंदर्य यांनी केली आहे. या नवीन मुल्यामुळे नव लेखकाला लेखनाची दिशा मिळणार आहे.त्यामुळे या ग्रंथाचे वेगळेपण अधोरेखित होते. असे ते यावेळी म्हणाले. ज्येष्ठ विचारवंत प्रा डॉ वासुदेव मुलाटे यांनी या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करत असताना असे म्हणाले की, येणाऱ्या काळात दलित साहित्य आणि आत्मकथनाच्या प्रांतात सौंदर्य यांचा हा ग्रंथ अपरिहार्य ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाला डॉ प्रज्ञा साळवे,गो. रा. तायडे,डॉ बाळासाहेब लिहिणार, डॉ शेजवळ,डॉ.धनंजय रायबोले, डॉ कोंडबा हटकर, डॉ. दैवत सावंत, डॉ.मिलिंद व्हावळे, डॉ.सुधाकर नवसागर,संपादक रतनकुमार साळवे, अनिल हाडगेकर, डॉ वर्षा सौंदर्य, विदिशा सौंदर्य, आनंद सौंदर्य,पंकज शिंदे, विकास वाघमारे,दयानंद कांबळे, राजश्री वाडमारे, स्वप्ना धनेधर आदी मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाची बहारदार सूत्रसंचालन डॉ.शिवाजी डोळसे यांनी केले तर आभार डॉ.बाळासाहेब गायकवाड यांनी मांडले. यावेळी शहरातील रसिक श्रोते साहित्यिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ८ जानेवारी २०२६

# गरिबीविरुद्ध लढा : मानवी वेदनांपासून सामाजिक न्यायापर्यंतचा संघर्ष

**मा**नवी इतिहासात विविध संस्कृती, राज्यव्यवस्था आणि आर्थिक पद्धती उदयास आल्या, नष्ट झाल्या; परंतु गरिबी हा प्रश्न मात्र प्रत्येक काळात वेगवेगळ्या स्वरूपात टिकून राहिलेला दिसतो. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आणि प्रगतीच्या घोषणांमध्येही गरिबीचे अस्तित्व आजही वास्तव आहे. ०८ जानेवारी रोजी साजरा होणारा गरिबीविरुद्ध लढा दिन (War on Poverty Day) हा केवळ एखाद्या सामाजिक घटनेची आठवण करून देणारा दिवस नसून, तो समाजाच्या अंतःकरणाला प्रश्न विचारणारा आणि विकासाच्या संकल्पनेला पुन्हा तपासण्यास भाग पाडणारा दिवस आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, गरिबी ही केवळ पैशाच्या अभावाची समस्या नसून, ती मानवी प्रतिष्ठा, सामाजिक संधी, समानता आणि न्याय यांच्याशी निगडित असलेली एक खोल सामाजिक समस्या आहे.गरिबीचा विचार करताना समाजशास्त्र तिच्याकडे एक बहुआयामी सामाजिक वास्तव म्हणून पाहते. गरिबी म्हणजे केवळ दोन वेळचे अन्न न मिळणे नाही; तर शिक्षण, आरोग्य, सुरक्षित निवारा, सन्मानजनक रोजगार, सामाजिक संरक्षण, आणि समाजातील निर्णयप्रक्रियेत सहभाग यांपासून वंचित राहणे होय. अनेक वेळा एखादी व्यक्ती गरीब असण्याचे कारण तिच्या वैयक्तिक क्षमतेपेक्षा ती ज्या सामाजिक रचनेत जन्माला येते, त्या रचनेतील असमानता असते. जात, वर्ग, लिंग, धर्म, प्रदेश आणि शिक्षण या घटकांवर आधारित भेदभावामुळे समाजातील काही गट कायमस्वरूपी गरिबीच्या कडेलोटावर उभे राहतात. म्हणूनच गरिबी ही वैयक्तिक अपयश नसून, ती सामाजिक व्यवस्थेतील अन्यायाचे प्रतिबिंब आहे.भारतीय समाजाच्या संदर्भात गरिबीचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आणि बहुआयामी आहे. भारतात आर्थिक विकासाच्या अनेक योजना राबविल्या गेल्या, औद्योगिकीकरण झाले, शहरीकरण वाढले आणि सेवा क्षेत्र विस्तारले; मात्र या विकासाचा लाभ सर्वसामान्य माणसापर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नाही. ग्रामीण भागात आजही शेतीवर अवलंबून असलेली कुटुंबे हवामानातील अनिश्चितता, उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता आणि कर्जबाजारीपणामुळे गरिबीत अडकलेली आहेत. दुसरीकडे शहरी भागात रोजगाराच्या संधी असल्या, तरी झोपडपट्ट्यांमधील जीवन, अपुऱ्या मूलभूत सुविधा, असुरक्षित कामकाज आणि सामाजिक संरक्षणाचा अभाव यामुळे शहरी गरिबीचे वेगळेच भयावह स्वरूप दिसून येते. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे स्पष्ट होते की गरिबी ही ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही पातळ्यांवर सामाजिक विकासाला मोठे आव्हान ठरते.गरिबीचा सर्वाधिक फटका समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांना बसतो. अनुसूचित जाती-जमाती, भटक्या-विमुक्त जमाती, अल्पसंख्याक समुदाय, महिला, अपंग व्यक्ती आणि स्थलांतरित कामगार हे घटक सामाजिक व आर्थिक दोन्ही स्तरांवर असुरक्षित असतात. विशेषतः महिलांच्या बाबतीत गरिबीचे स्वरूप अधिक तीव्र असते. शिक्षणाच्या संधींचा अभाव, रोजगारातील भेदभाव, कमी मजुरी, असुरक्षित कामकाज आणि घरगुती जबाबदाऱ्यांचा भार यामुळे महिला दुहेरी शोषणाचा सामना करतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून असे दिसते की महिलांचे सक्षमीकरण केल्याशिवाय गरिबीविरुद्धचा लढा यशस्वी होऊ शकत नाही.गरिबीविरुद्ध लढा दिनाचे महत्त्व यासाठी अधोरेखित करावे लागते की हा दिवस समाजाला आत्मपरीक्षणाची संधी देतो. विकासाचा अर्थ नेमका काय, हा प्रश्न हा दिवस उपस्थित करतो. केवळ राष्ट्रीय उत्पन्न वाढणे, मोठे प्रकल्प उभे राहणे किंवा आकडेवारीत सुधारणा होणे म्हणजे विकास नव्हे. खरा विकास तोच, ज्यामध्ये समाजातील शेवटच्या माणसाचे जीवनमान सुधारते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, ज्या समाजात संपत्ती काही मोजक्या लोकांकडे केंद्रीत होते आणि बहुसंख्य लोक मूलभूत गरजांसाठी संघर्ष करतात, तो समाज समतोल आणि न्याय्य ठरत नाही. म्हणून गरिबीविरुद्धचा लढा हा समतामूलक समाजनिर्मितीचा संघर्ष आहे.शिक्षण हे गरिबीविरुद्धच्या लढ्यातील सर्वात प्रभावी साधन मानले जाते. शिक्षणामुळे व्यक्तीला रोजगाराच्या संधी मिळतात, सामाजिक जाणीव विकसित होते आणि आत्मविश्वास निर्माण होतो. पिढ्यानुपिढ्या चालत आलेली गरिबीची साखळी तोडण्याची ताकद शिक्षणात आहे. मात्र गरीब कुटुंबांतील मुलांना शिक्षणापर्यंत पोहोचताना अनेक अडथळे येतात. आर्थिक अडचणी, बालमजुरी, शाळा सोडण्याचे प्रमाण, मुलींच्या शिक्षणाकडे होणारे दुर्लक्ष आणि डिजिटल साधनांचा अभाव यामुळे शिक्षणातील विषमता वाढते. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, शिक्षणव्यवस्थेतील ही विषमता दूर करणे हे गरिबी निर्मूलनासाठी अत्यावश्यक आहे.आरोग्य आणि गरिबी यांचा संबंधही अतिशय घनिष्ठ आहे. गरीब कुटुंबांमध्ये आजारपण हे केवळ शारीरिक त्रासापुरते मर्यादित न राहता, ते आर्थिक संकटाचे कारण ठरते. उपचाराचा खर्च, काम करण्याची क्षमता कमी होणे आणि दीर्घकालीन आजार यांमुळे कुटुंब अधिक गरिबीत ढकलले जाते. समाजशास्त्रीय अभ्यासातून हे स्पष्ट होते की सार्वत्रिक, सुलभ आणि परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध झाल्यास गरिबीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. म्हणून सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेचा बळकटीकरण हा गरिबीविरुद्धच्या लढ्यातील महत्त्वाचा घटक आहे.रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा गरिबीविरुद्धच्या संघर्षाचा केंद्रबिंदू आहे. बेरोजगारी आणि अल्परोजगारी ही गरिबीची प्रमुख कारणे आहेत. विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगारांना कमी मजुरी, सामाजिक सुरक्षा नसणे आणि रोजगाराची अनिश्चितता यांचा सामना करावा लागतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, केवळ रोजगारनिर्मिती पुरेशी नसून, सन्मानजनक, सुरक्षित आणि टिकाऊ रोजगार उपलब्ध होणे आवश्यक आहे. कौशल्यविकास, स्वयंरोजगार, सहकारी चळवळी आणि स्थानिक संसाधनांवर आधारित उद्योग यांमुळे आर्थिक स्वावलंबन वाढू शकते.गरिबीविरुद्धच्या लढ्यात शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अन्नसुरक्षा, रोजगार हमी, निवारा, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक समावेशनाच्या योजना गरिबांसाठी आधारस्तंभ ठरू शकतात. मात्र समाजशास्त्रीय अभ्यास सांगतो की योजनांचा प्रत्यक्ष लाभ गरजूंपर्यंत पोहोचण्यासाठी पारदर्शक अंमलबजावणी, प्रशासनाची संवेदनशीलता आणि लोकसहभाग अत्यावश्यक आहे. केवळ योजना जाहीर करणे पुरेसे नसून, त्या प्रभावीपणे राबविल्या गेल्या पाहिजेत.स्वयंसेवी संस्था, सामाजिक चळवळी आणि स्थानिक समुदाय यांची भूमिका गरिबी निर्मूलनात अत्यंत मोलाची आहे. तळागाळातील गरजा ओळखून स्थानिक पातळीवर उपाययोजना राबविण्याची क्षमता या संस्थांकडे असते. महिला स्वयं-सहायता गट, ग्रामविकास उपक्रम, झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम आणि सामाजिक उद्योजकता यांमुळे अनेक कुटुंबांचे जीवनमान सुधारले आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे उपक्रम सामाजिक ऐक्य आणि सहभाग वाढवतात, जे दीर्घकालीन बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक आहे.आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानालाही गरिबीविरुद्धच्या लढ्यात महत्त्वाचे स्थान आहे. डिजिटल सेवा, ऑनलाइन शिक्षण, थेट लाभ हस्तांतरण आणि माहितीपर पोहोच यांमुळे अनेक अडथळे कमी झाले आहेत. मात्र डिजिटल दरी ही नवीन सामाजिक विषमता निर्माण करत आहे. गरीब आणि वंचित घटकांना तंत्रज्ञानाचा समान लाभ मिळावा, यासाठी विशेष प्रयत्न आवश्यक आहेत.गरिबीविरुद्ध लढा दिन आपल्याला ठामपणे सांगतो की गरिबी निर्मूलन हा दयेचा नव्हे, तर *हक्कांचा आणि न्यायाचा प्रश्न* आहे. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. अन्न, शिक्षण, आरोग्य, निवारा आणि रोजगार हे मूलभूत मानवी हक्क आहेत. जोपर्यंत समाजातील शेवटच्या घटकाचे जीवनमान उंचावत नाही, तोपर्यंत विकास अपूर्णच राहतो.अखेरीस, ०८ जानेवारी, गरिबीविरुद्ध लढा दिन हा केवळ स्मरणाचा नव्हे, तर कृतीचा संकल्प करण्याचा दिवस आहे. गरिबी ही अटळ नियती नसून, ती मानवनिर्मित सामाजिक वास्तव आहे आणि त्यामुळे ती बदलण्याची ताकदही मानवाकडेच आहे. सामाजिक संवेदनशीलता, समतामूलक धोरणे, लोकसहभाग आणि मानवी मूल्यांवर आधारित विकासाच्या मार्गानेच गरिबीवर मात करणे शक्य आहे. खऱ्या अर्थाने प्रगत समाज तोच, जिथे कोणतीही व्यक्ती उपेक्षित, वंचित किंवा दुर्लक्षित राहत नाही. गरिबीविरुद्धचा लढा हा एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता, तो आपल्या दैनंदिन सामाजिक जबाबदारीचा अविभाज्य भाग बनवणे, हीच या दिवसाची खरी सार्थकता आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
bagate.rajendra5@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ८ जानेवारी २०२६


## आजच्या युवकांनी सामाजिक भान जपावे - प्रा. डॉ. आर. एन. निगडे




**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील मौजे कदेर येथे श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी शिबिरात विद्यार्थ्यांच्या समोर बौद्धिक व्याख्यानात "विकसित भारत व ग्रामस्वच्छतेमधे युवकांचे योगदान“ या विषयावर ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत व्यासपीठावर प्रा. डॉ. एस.एम.पतंगे, डॉ. मेघा जोशी, डॉ. विनोद धनेराव, प्रा. एन. जे. पवार, डॉ. मल्लमा आंबुसे प्रा.देशमुख ,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.बी. जे.उगले,डॉ.बालाजी कोनाळे हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीस संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली.प्रा. डॉ. निगडे पुढे म्हणाले की, युवकांनी अत्यंत सजगपणे व जाणीव जागृतीने आपले जीवन व्यतीत केले पाहिजे. आजचे वय म्हणजे तुमच्या संपन्न आणि समृद्ध आयुष्याची पाया भरणी करण्याचे वय आहे. ग्रामस्वच्छता म्हणजे नुसती गावातील कचरा साफ करणे नसून आपल्या डोक्यात भरलेला विविध कचरा सुद्धा आपल्याला साफ करता आला पाहिजे तरच २०४७ पर्यंत आपला भारत विकसित भारत म्हणून उभा राहू शकेल. राष्ट्रीय सेवा योजनेचे हे शिबिर म्हणजे तुमच्या सुप्त कला गुणांना नुसते व्यासपीठ मिळवून देण्याचे मध्यम नसून आपल्या सम्यक वाचा आणि वर्तनातून सामाजिक न्यायाची प्रतिष्ठापना करणे हे ही एक निकोप आणि निर्मळ समाजव्यवस्था निर्माण करण्याचे साध्य होय. हे अत्यंत अगत्याचे असून तरच खऱ्या अर्थाने राष्ट्र प्रगती करू शकते. सक्षम भारत निर्माण करावयाचा असेल तर आपले व समाजाचे आरोग्य उत्तम असले पाहिजे त्यामुळेच देश बदलू शकतो अन्यथा नाही. मोबाईल आणि रील्स मध्ये भविष्य नसून वाचन मनन व चिंतन यातच खऱ्या अर्थाने देशाचे सौख्य सामावले आहे. "विकसित भारत व ग्रामस्वच्छतेमधे युवकांचे योगदान" या बौद्धिक व्याख्यानाचे अध्यक्ष प्रा. डॉ. महादेव खोत यांनीही विद्यार्थ्यांनी देशाच्या मुख्य प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आपले व्यक्तिमत्व सिद्ध केले पाहिजे.अपमान ,अवहेलना पचवण्यास शिकले पाहिजे,निराश न होता चिकाटीने आणि जिद्दीने प्रयत्नांची पराकाष्ठा केली की हमखास यश गवसणी घालते त्यामुळे नैराश्याच्या गर्तेतून विद्यार्थ्यांनी बाहेर पडावे असे भावनिक आवाहन केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा.डॉ.भाऊसाहेब उगले यांनी सकाळच्या सत्रात हाती घेतलेल्या स्वच्छता मोहिमेची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालय,पशुवैद्यकीय दवाखान्याचा परिसर स्वच्छ केला. त्याचबरोबर वृक्ष संगोपनासाठी वृक्षांना आळे करून दिले,आजूबाजूचे गवत काढून बसवेश्वर चौक स्वच्छ केला.श्रमदान झाल्यानंतर मग श्रमपरिहार झाला त्यानंतर दुपारी दोन वाजता बौद्धिक व्याख्यानास सुरुवात झाली.का सबंध कार्यक्रमाचे नेतृत्व व सूत्रसंचालन शिबिरातील विद्यार्थिनी प्रतिनिधी कू. काव्या माळगे या शिबिरार्थीने केले तर कार्यक्रमाचे आभार कु.महानंदा काटकधोंड हिने व्यक्त केले.या कार्यक्रमास गावातील नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## स्वत:चा शोध घ्या... इतरांकडून अपेक्षा करू नका - डॉ. गजानन सानप याचे प्रतिपादन



**जालना** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर व बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत विकासासाठी युवक : जल व्यवस्थापन आणि पडीक जमीन विकास या विषयावर आधारित सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन समिती सदस्य डॉ. गजानन सानप यांच्या हस्ते गोंदेगाव जिल्हा जालना येथे करण्यात आले. डॉ. गजानन सानप म्हणाले, स्वतःचा शोध घ्या... इतरांकडून अपेक्षा करू नका. स्वावलंबी जीवन तुम्हाला आत्मविश्वास देते. सकारात्मक विचार करून आपले ध्येय साध्य करा. तुमच्यात जिद्द आणि कुतूहल असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही. अगदी कमी वयात सुद्धा अनेकांनी आपले ध्येय साध्य केले आहे. 21 ते 25 या वयाच्या कालखंडात सुद्धा अनेक तरुण मुलं-मुली मोठाले अधिकारी झाले आहे. अगदी सर्वसामान्य गरीब कुटुंबातले मुलं सुद्धा अतिशय उच्च स्थानी गेले आहेत. बरेचदा आपण आपल्यातील क्षमता ओळखतच नाही. आपल्यात खूप काही असते मात्र ते आपण इतरांसमोर सादर करत नाही. इतरांचे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व अभ्यासा. काहीतरी संकल्प करा आणि त्याची अंमलबजावणी सुरू करा निश्चितच चांगले बदल घडून येतील.यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांनीही समयोचित विचार व्यक्त केले. यावेळी सरपंच अश्विनी वाघ, पोलीस पाटील श्रीमती मगर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संदीप वाघ यांच्यासह गावकरी उपस्थित होते. हे शिबिर ७ ते १४ जानेवारी दरम्यान सुरू राहणार आहे. या दरम्यान विविध उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, समाज प्रबोधन, ग्रामस्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य जनजागरण, विकासाचे उपक्रम राबविले जाणार आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमध्ये चारित्र बांधणी, नेतृत्व आणि संघटनात्मक कौशल्य तसेच समाज आणि राष्ट्र उभारणी निर्माण व्हावा यासाठी हे शिबिर राबवण्यात येत आहे. राष्ट्रीय योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. उद्धव थोरवे, डॉ. क्षमा अनभुले, प्रा. अभिजीत भुतेकर यांच्यासह इतर स्वयंसेवक शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

## अय्युब पठाण यांना साहित्यरत्न पुरस्कार जाहीर



**छत्रपती संभाजीनगर : (प्रतिनिधी)** पुणे येथील एस. फोर. सोल्युशन्सच्यावतीने आणि पुणे पुस्तक महोत्सवाचे औचित्य साधून २०२५ चा साहित्यरत्न पुरस्कार यंदा मराठवाडयाचे प्रसिध्द बालकवी तथा लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांना जाहीर करण्यात आला आहे. अय्युब पठाण हे मागील चाळीस वर्षापासून मराठी साहित्यक्षेत्रात सातत्याने भरीव लेखन करून आता पर्यंत त्यांचे पंधरा पुस्तके प्रकाशित असून बालभारतीच्या इयत्ता सहावीच्या इंग्रजी व हिंदी, इस.बी. एस. ई. माध्यमाला त्यांची " पाणपोई " ही कविता जून २०१६ पासून अभ्यासक्रमात समाविष्ठ आहे. तसेच अय्युब पठाण हे "बॅन्डमास्टर" असतांना त्यांनी १८ वर्षात साडेचार हजार वधू-वरांच्या लग्नात बॅन्डबाजा वाजवून समाजाचे मनोरंजन केले आहे. तसेच शिक्षक असतांना १५ हजार विद्यार्थी ३२ वर्षाच्या कालावधीत आपल्या प्रभावी अध्यापनातून घडविले आहे. तसेच सांस्कृतिक कार्यक्रम " मुले रंगली काव्यात " या एकपात्री उपक्रमातून १२७ प्रयोगातून विद्याथ्र्यामध्ये जनजागृती व प्रबोधनाचे कार्य केले आहे. अय्युब पठाण यांच्या अशा अजोड कार्यांची योग्य दखल घेऊन पुणे येथील एस. फोर. सोल्युशनने त्यांना २०२५ चा साहित्यरत्न पुरस्कार जाहीर केला आहे.या पुरस्काराचे स्वरूप मानाची पुणेरी पगडी, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व रोख रक्कम असे असून लवकरच पुणे येथे मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार श्री.अय्युब पठाण लोहगावकर यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.


